**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 15/07/2021 Accepted on : 29/07/2021 Publication Date: 31/07/2021

# "सांस्कृतीक व सामाजिक घटकाचा संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम एक अभ्यास"

**डॉ. अशोक पांडूरंग गिणगिने**
संशोधन मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

**स्वामी दुर्गादेवी सदाशिव**
संशोधिका
शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

Email - durgadeviswami21@gmail.com

**प्रस्तावना:**

शालेय शिक्षणाचा आरंभ हा विद्यार्थ्यांचा विकासाच्या मार्गवरचा महत्वाचा टप्पा असतो. परिसरात घडणाऱ्या सहज शिक्षणाला शाळेमध्ये परिपुर्ण व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शिक्षण शास्त्रीय कालमर्यादीत नियोजनाची जोड मिळणे. हे नियोजन साध्य करण्यासाठी शाळा, शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा असे पाठबळ प्राप्त होते. शिक्षणामुळे व्यक्ती स्वत: चा विकास साधत असतांना भोवतालच्या समाजाची सस्कृती व परंपरा स्वीकारुन समाजात सामावली जाते. प्रत्येक विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व वेगळे असते. प्रत्येकाची आकलन क्षमता, आवधानकक्षा, आवडी-निवडी, कल इत्यादी भिन्न असतात. त्यामुळे प्रत्येकाची शिकण्याची गती वेगळी असते. कौटुंबिक अडचण आजारपण तसेच व्यवसायिक कामामुळे शाळेतील अनुपस्थिती इत्यादी बाबीचा अध्ययनावर विपरित परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या अध्यनात आकलनामध्ये आणि कौशल्य विकासामध्ये उणिवा, त्रुटी राहु शकतात. असे विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत मागे पडतात. त्यांच्या क्षमतांचा विकास झाला नाही की समायोजन साधु शकत नाहीत व संकल्पना निर्मिती पातळीत मागे राहतात.

अनेकदा वर्गात अध्यापनाचे काम करत असतांना शिक्षकांचा समज असतो की, जे विद्यार्थी ज्या विषयात प्रबळ आहे असे आपले निरीक्षण असते. त्या विद्यार्थ्याला त्या विषयाच्या अतिरिक्त पुरक मार्गदर्शनाची त्याच्या प्रबळ विषयातील एखाद्या संबोध किंवा संकल्पना निर्मिती किंवा संकल्पना स्पष्ट होण्याकरीता अतिरिक्त पुरक मार्गदर्शन करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यामध्ये भिन्नता आढळून येते. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी अध्ययनाची संकल्पना ज्या प्रमाणे हळुहळु विकसित होत गेली. त्याच प्रमाणे अध्यापनाची संकल्पना ही बदलत गेली. एक काळ असा होता की, ज्या काळात अध्यापनात केवळ माहिती देणे अभिप्रेत होते. शिक्षक म्हणजे ज्ञानाचा प्रचंड मोठा साठा या प्रचंड ज्ञानाच्या साठ्यातील ज्ञान त्यांना अध्ययन होण्यापर्यंत पोहचवणे असे कार्य होते. पण ही केवळ ज्ञानदानाची कल्पना हळुहळु मागे पडली काळ जसा-जसा पुढे लोटला तसा अध्यापनाचा अर्थ अधिक व्यापक होत गेला. अध्यापन म्हणजे अध्ययनर्थ्याना केवळ माहिती देणे, ज्ञान देणे, एवढेच नव्हे तर विविध कौशल्ये ही शिक्षकांनी अध्ययानर्थ्यांना ज्ञानासोबत दिली पाहिजेत. एकविसाव्या शताकात तर इंटरनेटच्या मदतीने एखद्या विषयावरील अद्यायावत ज्ञान अध्ययनार्थ्याला घरबसल्या सहजपणे मिळवणे शक्य झाले आहे.

समाजाच्या बदलत्या गरजाप्रमाणे विविध विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होत आहेत. विविध उपक्रमांचा प्रवाहाचा प्रणालीचा, विविध अध्यापन तंत्राचा, अध्ययन पध्दतीचा प्रणालीमध्ये बदल होत आहेत. अशा विविध विचारांचा वापर करत असतांना विद्यार्थांना अनुभव येतात हे अनुभव येत असताना विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मिती क्षमताचा अभ्यास केला जातो. विद्यार्थ्यांतील संकल्पना निर्मिती पातळी किंवा क्षमता शोधण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अध्यायनक्षमतेचे मुल्यमापन करावे. सातत्यपुर्ण सर्वंकष मुल्यमापनाव्दारे ज्या विद्ययार्थ्यांची अध्ययनक्षमता किंवा संकल्पना निर्मिती पातळी अविकसित आहे. असे शिक्षकाच्या लक्षात येते. त्या विद्यार्थ्यांकरिता, विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन विषेश अनुभवाची निर्मिती किंवा निवड शिक्षकाने करावी. या अध्ययन अनुभवाव्दारे विद्यार्थी स्वत:च्या ज्ञानाची रचना करुन संकल्पनाची निर्मिती करेल.

संकल्पना निर्माण होणे किंवा तयार होणे आश्यक आहे. संकल्पना निर्माण होण्याची पहिली पायरी म्हणजे संल्पना निर्मिती होय, असे ब्रुनरचे मत आहे. विद्यार्थी विविध वस्तु व्यक्ती, प्रसंग त्याचे वर्गीकरण गटामध्ये करतात. या क्रियेला संकल्पना निर्मिती असे म्हणतात. या क्रियेमध्ये विद्यार्थी परिसारातील असलेल्या विविध वस्तुमधील फरक लक्षात घेऊन वस्तु ओळखण्यास शिकतात. जर विद्यार्थी भाषा शिकलेला असेल तर तो संकल्पनेला नाव देतो. हे संकल्पना निर्मितीचे उदाहरण आहे. या प्रतिमानामध्ये वर्गीकरण करुन जे अनेक गट तयार होतात तो प्रत्येक गट वेगवेगळी संकल्पना दर्शविते.

**संशोधनाची गरज**

शालेय शिक्षणामधुन विद्यार्थ्यांच्याज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या जाव्यात ही अपेक्षा अत्यंत मुलभुत आणि स्वाभविक आहे. त्याचबरोबरच विद्यार्थ्यांमधील विविध संकल्पना निर्मितीचा विकास होणेही अपेक्षित आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व वेगळे असते प्रत्येकाची आकलन क्षमता, उपयोजन क्षमता, अवधान कक्ष, आवडी-निवडी व कल इत्यादी भिन्न असते.

त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याची शिकवण्याची गती वेगळी असते. कौटुंबीक अडचण सांस्कृतीक व सामाजिक घटकांचा तसेच व्यावसायिक कामामुळे शाळेतील अनुपस्थिती इत्यादी बाबींचा अध्ययनावर विपरीत परिणाम होतो. विद्यार्थ्याच्या अध्ययनात आकलनात आणि कौशल्यविकसनामध्ये उणिवा व त्रुटी राहू शकतात. असे विद्यार्थी संकल्पना निर्मिती प्रक्रियेत मागे पडतात. त्यंाचा संकल्पना निर्मिती क्षमातांचा विकास न झाल्याने ती समायोजन साधु शकत नाहीत व संकल्पना निर्मिती पातळीत मागे पडतात. त्या विद्यार्थ्यांलाही त्यांच्या प्रबळ विषयातील एखाद्या संबोध किंवा संकल्पना निर्मिती क्षमता वाढवण्यासाठी अशा संशोधनाची गरज आहे.

**समस्या विधान:**

"सांस्कृतीकव सामाजिक घटकाचा संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम एक अभ्यास"

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

1. सांस्कृतीक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.
2. सामाजिक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाची परिकल्पना:**

1. सांस्कृतीक घटकांचा मुलांच्या व मुलींच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.
2. सामाजिक घटकांचा मुलांच्या व मुलींच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.

**सशोधनाची व्याप्ती:**

1. प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्ह्याचा विचार केलेला आहे.
2. प्रस्तुत सेशाधनासाठी परभणी जिल्ह्यातील 9 तालुक्याचा विचार केलेला आहे.
3. प्रस्तुत संशोधनासाळी 9 तालुक्यातील 18 शाळांचा विचार केलेला आहे.
4. प्रस्तुत संशोधनासाठी उच्च प्राथमिक शाळांचा विचार केला आहे.
5. प्रस्तुत संशोधनासाठी उच्च प्राथमिक शाळातील इयत्ता 7 वीच्या विद्यार्थ्यांचा विचार केलेला आहे.
6. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2016-2019 विचार केलेला आहे.

**संशोधनाची मर्यादा:**

1. प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्ह्यापुरते मर्यादीत आहे.
2. प्रस्तुत संशोध्न हे परभणी जिल्ह्यातील 9 तालुक्यापुरते मर्यादीत आहे.
3. प्रस्तुत संशोधन उच्च माध्यमिक स्थरावरील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
4. प्रस्तुत संशोध्न उच्च्ा माध्यमिक स्थरावरील इयत्त 7 वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादीत आहे.
5. प्रस्तुत संशोधन शैक्षणिक वर्ष 2018-19 पुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने परभणी जिल्ह्यातील 9 तालुक्यांचा विचार केलो आहे. उच्चप्राथमिक शाळेतील इयत्ता 7 वीच्या शैक्षणिक वर्ष 2018-2019 मधील विद्यार्थ्यांचा व 9 तालुक्यातील शहरी व ग्रामीण 29164 विद्यार्थ्यांचा जनसंख्येत विचार केलेला आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**संशोधनाची साधने:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने पुढील साधनांची निवड केली आहे.

**प्रमाणीत चाचणी**

1. संकल्पना प्राप्ती चाचणी (CAT)- अनुराधा जोशी, रत्नमाला आर्या.
2. सामाजिक आर्थिक दर्जाचे मापण करणारी शोधिका (SESS) आर. एल. भरव्दाज

Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 15/07/2021 Accepted on : 29/07/2021 Publication Date: 31/07/2021

**संख्याशास्त्रीय परिणामे:**

1. Z गुणांक
2. t- चाचणी
3. प्रमाण विचलण
4. मध्यमान
5. प्रमाण त्रुटी
6. सहसंबंध
7. मध्यमान फरकातील प्रमाण त्रुटी

**तक्ता क्र 1.1**

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटकाचा सामाजिक घटकांवर होणारा परिणाम या घटकाचा केलेला अभ्यास मध्यमान, प्रमाण विचलन प्रमाणत्रुटी मध्यमानातील फरकांची प्रमाणत्रुटी, सहसंबंध, प्राप्त ‘t’ मुल्य या सांख्यीकीय परिणामाव्दारे दर्शविण्यात आला आहे.

| न्यादर्श (N) | माध्यमान (M) | प्रमाण विचलन (SD) | प्रमाण त्रुटी (SE) | माध्यमानातील फरकाची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) | सहसंबंध (r) | स्वाधीनत मात्रा (df) | प्राप्त ‘t’ मुल्य | संख्या शास्त्रीय ‘t’ मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थांचा सांस्कृतीक घटक (490) | 7.0131 | 1.003 | 0.0451 | 0.063 | -0.032 | 978 | -0.0135 | 1.96 |
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक घटक (490) | 0.00093 | 0.996 | 0.045 | | | | | |

**विश्लेषण:-**

उपरोक्त तक्ता क्र. 1.1 मध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटकांचा सामाजिक घटकांवर होणारा परिणाम यांचा सांख्यिकीय दृष्टीने विश्लेषण केले आहे. या तक्त्यामध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्ययार्थ्यांचा सांस्कृतीकघटकाच्या संदर्भात मध्यमान (M) 7.013, प्रमाण विचलन (SD) 1.0003, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 तर सामाजिक घटकाच्या संदर्भात मध्यामान (M) 0.00093, प्रमाण विचलन (SD) 0.996, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 त्यांच्या मध्यमानातील फरकांची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) -0.032 स्वाधीनता मात्रा (df) 978, सहसंबंध (r) -0.032 आणि प्राप्त ’t’ मुलय -0.0135 आहे.

**अर्थनिवर्चन :**

प्राप्त ‘t’ मुल्य -0.0135 हे संख्याशास्त्रीय ‘t’ मुल्यापेक्षा 1.96 कमी असल्याने प्राप्त ‘t’ मुल्य असार्थक (Insignificant) आहे.

**निष्कर्ष :-**

0.05 सार्थकतास्तरावर प्राप्त ‘t’ मुल्य सार्थक नसल्यामुळे शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 15/07/2021 Accepted on : 29/07/2021 Publication Date: 31/07/2021

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटाकाचा सामाजिक घटकावर होणारा परिणाम यामध्ये सार्थफरक आहे.

**तक्ता क्र 1.2**

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटकांचा संकल्पना निर्मिती या घटकावर होणारा परिणाम या घटकाचा केलेला अभ्यास मध्यमान, प्रमाण विचलन, प्रमाणत्रुटी, माध्यमानातील फरकांची प्रमाणत्रुटी, सहसंबंध, प्राप्त 't' मुल्य या सांख्यीकीय परिणामाव्दारे दर्शविण्यात आला आहे.

| न्यादर्श (N) | माध्यमान (M) | प्रमाण विचलन (SD) | प्रमाण त्रुटी (SE) | माध्यमानातील फरकाची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) | सहसंबंध (r) | स्वाधीनत मात्रा (df) | प्राप्त 't' मुल्य | संख्या शास्त्रीय 't' मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थांचा सांस्कृतीक घटक (490) | 0.0011 | 1.003 | 0.045 | 0.063 | 0.014 | 978 | -0.033 | 1.96 |
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा संकल्पना निर्मिती (490) | 0.0022 | 1.00032 | 0.045 | | | | | |

**विश्लेषण:-**

उपरोक्त तक्ता क्र. 1.2 मध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटकांचा संकल्पना निर्मिती या घटकांवर होणारा परिणाम यांचा सांख्यिकीय दृष्टीने विश्लेषण केले आहे. या तक्तयामध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृती घटकांच्या संदर्भात मध्यमान (M) 0.0011, प्रमाण विचलन (SD) 1.0003, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 तर संकल्पना निर्मिती याघटकाच्या संदर्भात मध्यमान (M) 0.0022, प्रमाण विचलन (SD) 1.00032, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 त्यांच्या मध्यमानातील फरकांची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) 0.063 स्वाधीनता मात्रा (df) 978, सहसंबंध (r) 0.014आणि प्राप्त 't' मुल्य -0.033 आहे.

**अर्थनिवर्चन :**

प्राप्त 't' मुल्य -0.033 हे संख्याशास्त्रीय 't' मुल्यापेक्षा 1.96 कमी असल्याने प्राप्त 't' मुल्य असार्थक (Insignificant) आहे.

**निष्कर्ष :-**

0.05 सार्थकतास्तरावर प्राप्त 't' मुल्य सार्थक नसल्यामुळे शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतीक घटाकाचा संकल्पना निर्मिती या घटकांवर होणारा परिणाम यामध्ये सार्थफरक आहे.

**तक्ता क्र 1.3**

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक घटकाचा संकल्पना निर्मिती या घटकांवर होणारा परिणाम या घटकाचा केलेला अभ्यास मध्यमान, प्रमाण विचलन प्रमाणत्रुटी माध्यमानातील फरकांची प्रमाणत्रुटी, सहसंबंध, प्राप्त 't' मुल्य या सांख्यीकीय परिणामाव्दारे दर्शविण्यात आला आहे.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 15/07/2021 Accepted on : 29/07/2021 Publication Date: 31/07/2021

| न्यादर्श (N) | माध्यमान (M) | प्रमाण विचलन (SD) | प्रमाण त्रुटी (SE) | माध्यमानातील फरकाची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) | सहसंबंध (r) | स्वाधीनत मात्रा (df) | प्राप्त 't' मुल्य | संख्या शास्त्रीय 't' मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थांचा सामाजिक घटक (490) | 0.00093 | 0.996 | 0.045 | 0.063 | -0.0144 | 978 | -0.02005 | 1.96 |
| शहरी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा संकल्पना निर्मिती घटक (490) | 0.0022 | 1.00032 | 0.045 | | | | | |

**विश्लेषण:-**

उपरोक्त तक्ता क्र. 1.3 मध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक घटकांचा संकल्पना निर्मिती या घटकावर होणारा परिणाम यांचा सांख्यिकीय दृष्टीने विश्लेषण केले आहे. या तक्तयामध्ये शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामिण भागातील विद्ययार्थ्यांचा सामाजिक घटकांच्या संदर्भात मध्यमान (M) 0.00093, प्रमाण विचलन (SD) 0.996, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 तर संकल्पना निर्मिती याघटकांच्या संदर्भात मध्यामान (M) 0.0022, प्रमाण विचलन (SD) 1.00032, प्रमाण त्रुटी (SE) 0.045 त्यांच्या मध्यमानातील फरकांची प्रमाण त्रुटी ($\sigma_D$) 0.063 स्वाधीनता मात्रा (df) 978, सहसंबंध (r) 0.014 आणि प्राप्त 't' मुल्य -0.02005 आहे.

**अर्थनिवर्चन :**

प्राप्त 't' मुल्य -0.02005 हे संख्याशास्त्रीय 't' मुल्यापेक्षा 1.96 कमी असल्याने प्राप्त 't' मुल्य असार्थक (Insignificant) आहे.

**निष्कर्ष :-**

0.05 सार्थकतास्तरावर प्राप्त 't' मुल्य सार्थक नसल्यामुळे शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक घटाकाचा संकल्पना निर्मिती या घटकांवर होणारा परिणाम यामध्ये सार्थफरक आहे.

**निष्कर्ष :-**

1. शहरी भागातील विद्यार्थ्यांचा व विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक घटकाचा सामाजिक घटकावर होणारा परिणाम जास्त आहे.
2. शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा संकप्लना निर्मिती या घटकांचा सांस्कृतीक घटकांवर होणारा परिणाम जास्त आहे.
3. शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्याचा संकल्पना निर्मिती या घटकाचा सामाजिक घटकांवर होणारा परिणाम जास्त आहे.

**संदर्भ गंथसुची :**

1. डॉ. वासंती फडके, 1988, अध्यापनाची प्रतिमाने नुतन प्रकाशन, पुणे.
2. प्रा. वा. ना. दांडेकर (2000), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र विद्या प्रकाशन, पुणे 30 पृ. क्र. 291, 292, 293
3. अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणी अध्यापन प्रक्रिया पृ.क्र (156)
4. प्रा. चा. प. कदम (1989) शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन पुणे 30.
5. डॉ के.म.भाडारकर (1998) सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे.
6. डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, (जानेवारी 2007) सामाजिक संशोधन पध्दती (Social Research Methodology), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर.
7. रा. श. मुळे आणि वि.तु. (1998) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.